नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

| वर्ष - ४ रे<br>Year - 4rd | अंक - १०४<br>Issue - 104 | वार - मंगळवार दि. ८ सप्टेंबर २०२६<br>Blow- Tuesday Date 8 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करणार

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील; वंशावळ आणि कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे देणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. त्यासाठी १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे आयोजित करावीत; तसेच सर्व जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय ठेवून आरक्षणातील प्रत्येक प्रश्नाबाबत गांभीर्याने कार्यवाही करावी, अशा सूचना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागीय आयुक्तांसह सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सोमवारी दिल्या.

मंत्री विखे पाटील यांनी मराठवाड्यातील धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, लातूर, जालना या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांच्याशी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेऊन झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. या बैठकीमध्ये मंत्री विखे पाटील यांनी जिल्हानिहाय देण्यात आलेली जात पडताळणी प्रमाणपत्रांची संख्या, कुणबी नोंदी तसेच प्राप्त झालेल्या अर्जांचा सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने



आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीची तसेच अंमलबजावणीची सविस्तर माहिती बैठकीमध्ये सादर केली. यामध्ये प्रामुख्याने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाने सापडलेल्या नोंदी वेबसाईटच्या माध्यमातून जाहीर केल्या आहेत. त्याच पद्धतीने इतर जिल्ह्यांनीही अशाच प्रकारची कार्यवाही करावी आणि १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रमाणपत्रांच्या पूर्ततेसाठी शिबिरे आयोजित करून अधिक चांगल्या पद्धतीचे नियोजन करावे, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीमध्ये दिल्या.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मंत्री विखे पाटील म्हणाले, कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. वंशावळ आणि कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे दिली जातील. मराठवाड्यात आतापर्यंत साडेतीन लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाली आहेत. पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे देताना नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल. मनोज जरांगे पाटील हे समाजासाठी आंदोलन करीत असून, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत सरकार त्यांच्याशी चर्चा करणारच आहे. काही लोकांना त्या पायघड्या वाटत असतील, पण हे सर्व आरोप बिनबुडाचे आहेत. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकार पुढाकार घेत आहे; परंतु काही लोक मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी मुद्दाम आंदोलनाची भाषा करीत असतील तर ते चुकीचे असून, याद्वारे विनाकारण सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. सरकारने काहीही चुकीचे केलेले नाही व तशी भूमिकाही नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न कायदेशीर चौकटीत आणि सर्व समाजांच्या हिताचा विचार करून सोडविण्याची सरकारची भूमिका असून, पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत, असेही विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

### जरांगेंशी चर्चेची सरकारची तयारी

**मराठा आरक्षणाबाबत सरकार फक्त आश्वासने देत असल्याच्या मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपावर बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, मागील आंदोलनातील बहुतांश मागण्यांवर सरकारने कार्यवाही केली असून, उर्वरित मागण्यांवरही मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची भूमिका असून, आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्याची सरकारची कधीही तयारी आहे.**

## ग्रामीण भागातील एलपीजी ग्राहकांना दिलासा, गॅस सिलेंडर बुकिंगच्या ४५ दिवसांच्या नियमात बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्र सरकारनं तेल विपणन कंपन्यांना म्हणजेच ऑईल मार्केटिंग कंपन्यांना ग्रामीण भागातील एलपीजी सिलेंडर बुकिंगच्या कालवाधीमध्ये बदल करण्यास सांगितलं आहे. आता शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातील एलपीजी ग्राहकांना सिलेंडर बुकिंग २५ दिवसानंतर करण्यात येणार आहे. यासंदर्भातील माहिती केंद्रीय मंत्री सुरेश गोपी यांनी दिली आहे.

ग्रामीण भागातील एलपीजी ग्राहकांना दिलासा



सुरेश गोपी हे केंद्रीय मंत्रिमंडळात पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस, पर्यटन विभागाचे राज्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. केंद्र सरकारनं अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाच्या काळात मागणी आणि पुरवठा यांच्यामध्ये समतोल राहावा यासाठी ग्रामीण भागात गॅस सिलेंडर बुकिंगसाठी ४५ दिवसांचा कालावधी निश्चित केला होता. ग्रामीण भागातील ग्राहक ४५ दिवसानंतर सिलेंडर बुकिंग करु शकत होते. तर, शहरी भागातील एलपीजी ग्राहक २५ दिवसानंतर बुकिंग करु शक होते.

पेट्रोलियम मंत्रालयानं ७ सप्टेंबर म्हणजेच आजच इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदूस्तान पेट्रोलियम या कंपन्यांच्या चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालकांना पत्र लिहिलं आहे. एलपीजी पुरवठ्यामध्ये वाढ झाल्यानं आणि सिलेंडर रिफील संदर्भातील स्थिती सुधारल्याचं सांगण्यात आलं आहे.

सध्याची एलपीजी पुरवठ्याची स्थिती लक्षात घेता, रिफील संदर्भातील अनुशेष कमी झाल्यानं ग्रामीण भागातील सिलेंडर रिफीलसाठीचा कालावधी २५ दिवसांवर आणावा असं सांगण्यात आलं आहे. म्हणजेच ग्रामीण भागातील एखाद्या ग्राहकानं महिन्याच्या १ तारखेला सिलेंडर बुक केल्यानंतर आणखी एकदा सिलेंडर बुकिंग करायचा असेल तर त्याच महिन्यात २६ तारखेला सिलेंडर बुक करता येऊ शकतो. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष तीव्र झाला होता तेव्हा एलपीजी पुरवठ्याचं संकट निर्माण झालं होतं. तेव्हा सरकारनं परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अनेक पावलं उचलली होती. त्यापैकीच एलपीजी गॅस सिलेंडर बुकिंगसाठी काही दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला होता. ग्रामीण भागासाठी ४५ दिवस तर शहरी भागासाठी २५ दिवसांची अट घालण्यात आली होती . आता ग्रामीण आणि शहरी भागात देखील गॅस सिलेंडर बुकिंसाठी २५ दिवस थांबावं लागेल.

दरम्यान, केंद्र सरकारनं एलपीजीला पर्याय म्हणून विविध शहरांमध्ये पीएनजी कनेक्शन वाढवण्यावर भर दिला होता. देशातील विविध शहरांमध्ये ज्या ग्राहकांकडे पीएनजी कनेक्शन आणि एलपीजी कनेक्शन असेल त्यांना एलपीजी कनेक्शन सरेंडर करण्याचे आदेश देण्यात आले होते.

## राज्यातील कंत्राटदारांचे सरकारविरोधात ३२ जिल्ह्यांत आंदोलन; ८६ हजार कोटींची देयके थकली, जिल्हाधिकारी कार्यालयांवर धडक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शासकीय कंत्राटदारांनी प्रलंबित बिलांसह विविध मागण्यांसाठी सोमवारी राज्यभरात आंदोलनाची हाक दिली. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या वतीने राज्यातील तब्बल ३२ जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने करण्यात आली आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये राज्यातील कंत्राटदारांच्या दुर्दैवी आत्महत्येस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून चौकशी समिती नेमणे आणि मृत कंत्राटदारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देणे, याचा समावेश आहे. तसेच, राज्यातील सर्व विभागांकडील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली तब्बल ८६ हजार कोटी रुपयांची देयके तातडीने वितरीत करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, राज्यातील छोट्या कामांचे एकत्रीकरण करून मोठ्या निविदा प्रक्रिया राबवू नयेत, कारण यामुळे तीन लाखांहून अधिक लहान कंत्राटदारांची उपजीविका धोक्यात आली असल्याचे सांगण्यात आले. बिलांच्या अगोदरच जीएसटी भरण्याच्या अटीमुळे कंत्राटदारांची आर्थिक कुचंबणा होत असून हा नियम बदलण्याची मागणी करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षांत नवीन कामे मंजूर न झाल्याने राज्याचा विकास ठप्प झाल्याचा आरोप करत, ई-निविदा प्रक्रियेतील राजकीय दबाव आणि मनमानी तातडीने थांबवावी, अशी भूमिका राज्यभरातील कंत्राटदारांनी घेतली आहे. हे प्रश्न तातडीने न सोडवल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## भारतीय डाळिंबाला जागतिक बाजारपेठेत नवी ओळख मिळवण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करावे : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : भारतीय डाळिंबाला जागतिक बाजारपेठेत उच्च दर्जाचे, सुरक्षित आणि विश्वासार्ह उत्पादन म्हणून नवी आेळख मिळवून देण्यासाठी केवळ उत्पादन वाढवणे पुरेसे नाही. तर गुणवत्ता, उत्पादकता, निर्यात, प्रक्रिया आणि मूल्यवर्धन या सर्व घटकांवर भर देत शेतकरी, वैज्ञानिक, उद्योजक आणि शासनाने एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.पुण्यातील 'यशदा' येथे ६ ते ८ सप्टेंबरदरम्यान आयोजित 'डाळिंब परिषद-२०२६' या तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. ही परिषद भारतीय कृषी अनुसंधान परिषदेअंतर्गत कार्यरत सोलापूरचे राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोसायटी फॉर डव्हान्समेंट ऑफ रिसर्च ऑन पोमोग्रोनेट आणि राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे. कृषीमंत्री भरणे यांनी आपल्या भाषणात डाळिंब संशोधनातील पुण्याच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला. १९२१ मध्ये गणेशखिंड येथून कृषी संशोधनाला सुरुवात झाली आणि याच भूमीत प्रसिद्ध 'गणेश' वाण विकसित झाला. पुढे महात्मा फुले कृषी विद्यापीठाने विकसित केलेल्या 'भगवा' वाणामुळे डाळिंब लागवडीला मोठे बाळकडू मिळाले. २००५ मध्ये सोलापूर येथे राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राची स्थापना झाल्यानंतर वाण विकास, रोग-कीड नियंत्रण, पाणी व अन्नद्रव्य व्यवस्थापन, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि निर्यात क्षेत्रात क्रांती घडवणारे संशोधन झाले आहे. सध्या महाराष्ट्रात सुमारे १.०५ लाख हेक्टर क्षेत्रावर डाळिंबाची लागवड असून १२.२४ लाख मेट्रिक टन उत्पादन होते. देशाच्या एकूण डाळिंब उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा सुमारे ४३ टक्के इतका मोठा आहे. उत्पादन चांगले होत असतानाही शेतकऱ्यांना अपेक्षित उत्पन्न का मिळत नाही, या मूलभूत प्रश्नावर कृषीमंत्र्यांनी प्रकाश टाकला. तेल्या रोगासह विविध रोग-किडींचा प्रादुर्भाव, हवामानातील अनिश्चितता, बाजारभावातील चढ-उतार आणि निर्यातीतील अडचणींमुळे शेतकरी अडचणीत आहेत.

### पुण्यात 'आंतरराष्ट्रीय डाळिंब परिषद-२०२६' चा दिमाखदार शुभारंभ

**केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह; पश्चिम विभागीय परिषदेची २८ वी बैठक**

# महाराष्ट्र ३३,८७२ स्टार्टअप्ससह देशात अव्वल, मुंबई जागतिक भांडवलाचे केंद्र म्हणून उदयास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोवा, दि. ७ : महाराष्ट्र ३३,८७२ स्टार्टअप्ससह देशात प्रथम क्रमांकावर असून, देशाची वित्तीय राजधानी मुंबई जागतिक भांडवलाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून वेगाने उदयास येत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांनी आज गोवा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या पश्चिम विभागीय परिषदेच्या २८ व्या बैठकीत केले. केंद्रीय गृह मंत्रालयांतर्गत आंतरराज्यीय परिषद सचिवालयाद्वारे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्राच्या आर्थिक बळकटीचा गौरव

महाराष्ट्राच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाचा उल्लेख करत केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी राज्याची स्टार्टअप परिसंस्था आणि मुंबईचा वाढता जागतिक दर्जा या बाबींना ठळकपणे अधोरेखित केले. तसेच, महाराष्ट्राने प्राथमिक कृषी पतसंस्थांच्या (झउड) संगणकीकरणाचे ९८% काम पूर्ण करून उल्लेखनीय प्रगती साधली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

देशाचा पहिल्या तिमाहीत ७.८% विकास दर

२०२६-२७ या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताने ७.८% इतका विकास दर नोंदवल्याचे सांगत, जागतिक पातळीवरील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर हा दर साध्य करणे संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब असल्याचे केंद्रीय मंत्री




अमित शाह म्हणाले. पश्चिम विभाग हा देशासाठी अनेक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, देशातील सर्वात मोठे आर्थिक, औद्योगिक आणि वित्तीय केंद्र असल्याचेही त्यांनी सांगितले.

१२ वर्षांतील सहकार्यात्मक संघराज्यवाद

मागील १२ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधानात नमूद केलेली सहकार्यात्मक संघराज्यवादाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी कार्य केल्याचे केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी सांगितले. २०१४ पासून विभागीय परिषदांच्या बैठकांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे नमूद करत ते म्हणाले, २००४ ते २०१४ दरम्यान विभागीय परिषदा व त्यांच्या स्थायी समित्यांच्या एकूण २५ बैठका झाल्या होत्या, तर २०१४ पासून आतापर्यंत अशा एकूण ७१ बैठका झाल्या आहेत. बैठकांच्या संख्येतील ही जवळपास तिप्पट वाढ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'टीम इंडिया' संकल्पनेचे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकांमध्ये एकूण १८९३ मुद्द्यांवर चर्चा झाली, त्यापैकी १४४५ मुद्दे सोडवण्यात आले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सायबर गुन्हे व किनारपट्टी सुरक्षेवर भर

सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी सर्व अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांना ऋउऋछड प्रणाली व ख४उ केंद्राशी जोडणे आवश्यक असल्याचे केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी नमूद केले. तसेच, आगामी काळात किनारपट्टीच्या सुरक्षेला अधिक बळ देण्यासाठी गृह मंत्रालयाकडून विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या बैठकीत महिला व बालकांविरोधातील अत्याचाराच्या प्रकरणांच्या जलद तपास व सुनावणीसाठी विशेष जलदगती न्यायालयांचे प्रभावी कामकाज सुनिश्चित करणे, आपत्कालीन प्रतिसाद समर्थन प्रणाली (एठडड-११२), अन्न सुरक्षा मानकांशी संबंधित मुद्दे, आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, प्रत्येक गावाच्या निर्धारित कक्षेत प्रत्यक्ष बँकिंग सुविधा उपलब्ध करून देणे, रेल्वे विकास प्रकल्प व पर्यावरण मंजुरीशी संबंधित मुद्दे यांवर सविस्तर चर्चा झाली. याशिवाय, शहरी विकास नियोजन, वीज पुरवठ्याशी संबंधित समस्या, प्राथमिक कृषी पतसंस्थांना (झउड) अधिक सक्षम करणे, पोषण अभियानाच्या माध्यमातून बालकांमधील कुपोषण दूर करणे, शालेय विद्यार्थ्यांचे शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे, सार्वजनिक रुग्णालयांचा आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतील सहभाग, तसेच सायबर गुन्हेगारी व डिजिटल पायाभूत सुविधांशी संबंधित मुद्द्यांवरही चर्चा करण्यात आली.

यावेळी गोव्याचे मुख्यमंत्री व परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. प्रमोद सावंत, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, दादरा आणि नगर हवेली व दमण आणि दीव या केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक प्रफुल पटेल, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच संबंधित राज्यांचे प्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## संपादकीय....

### अव्वल स्थान

महाराष्ट्र ३३,८७२ स्टार्टअप्ससह देशात प्रथम क्रमांकावर असून, देशाची वित्तीय राजधानी मुंबई जागतिक भांडवलाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून वेगाने उदयास येत आहे. पश्चिम विभागीय परिषदेच्या २८ व्या बैठकीत केले. केंद्रीय गृह मंत्रालयांतर्गत आंतरराज्यीय परिषद सचिवालयाद्वारे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाचा उल्लेख करत केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी राज्याची स्टार्टअप परिसंस्था आणि मुंबईचा वाढता जागतिक दर्जा या बाबींना ठळकपणे अधोरेखित केले. तसेच, महाराष्ट्राने प्राथमिक कृषी पतसंस्थांच्या (झउड) संगणकीकरणाचे ९८% काम पूर्ण करून उल्लेखनीय प्रगती साधत आहे. २०२६-२७ या चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताने ७.८% इतका विकास दर नोंदवल्याचे सांगत, जागतिक पातळीवरील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर हा दर साध्य करणे संपूर्ण देशासाठी अभिमानाची बाब असल्याचे केंद्रीय मंत्री अमित शाह म्हणाले. पश्चिम विभाग हा देशासाठी अनेक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून, देशातील सर्वात मोठे आर्थिक, औद्योगिक आणि वित्तीय केंद्र आहे. मागील १२ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधानात नमूद केलेली सहकार्यात्मक संघराज्यवादाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी कार्य केल्याचे केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी सांगितले. २०१४ पासून विभागीय परिषदांच्या बैठकांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे नमूद करत ते म्हणाले, २००४ ते २०१४ दरम्यान विभागीय परिषदा व त्यांच्या स्थायी समित्यांच्या एकूण २५ बैठका झाल्या होत्या, तर २०१४ पासून आतापर्यंत अशा एकूण ७१ बैठका झाल्या आहेत. बैठकांच्या संख्येतील ही जवळपास तिप्पट वाढ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'टीम इंडिया' संकल्पनेचे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकांमध्ये एकूण १८९३ मुद्द्यांवर चर्चा झाली, त्यापैकी १४४५ मुद्दे सोडवण्यात आले आहे. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी सर्व अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांना ऋउऋड प्रणाली व ख४उ केंद्राशी जोडणे आवश्यक असल्याचे केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी नमूद केले. तसेच, आगामी काळात किनारपट्टीच्या सुरक्षेला अधिक बळ देण्यासाठी गृह मंत्रालयाकडून विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे.

# साक्षरता: मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(८ सप्टेंबर:आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन.)**

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन दरवर्षी ८ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस साक्षरतेचे महत्त्व आणि शिक्षणाचे अधिकार यावर जागरूकता वाढवण्यासाठी साजरा केला जातो. साक्षरता ही व्यक्तीच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. साक्षरतेच्या अभावामुळे व्यक्ती आणि समाज दोघेही मागे राहू शकतात. युनेस्कोने सन १९६६ मध्ये ८ सप्टेंबर या दिनाची स्थापना केली, त्याचा उद्देश जगभरातील साक्षरतेच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करणे आणि शिक्षणाच्या सार्वत्रिक हक्काची पूर्तता करणे होता. अनेक देशांमध्ये अजूनही साक्षरतेचा अभाव आहे, विशेषतः महिला आणि मुली यांच्यामध्ये. अशा परिस्थितीत, साक्षरतेची गती वाढवणे आणि साक्षरतेसाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी यांचा मार्गदर्शक प्रस्तुत लेख चोखंदळ वाचकांना समर्पित जी..... संपादक.

साक्षरता केवळ वाचन-लेखन यापुरती मर्यादित नाही, तर ती व्यक्तीच्या विचारक्षमतेचा, आत्मविश्वासाचा आणि समाजातील सहभागाचा आधार आहे. साक्षर लोक स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या जीवनात अधिक सकारात्मक बदल घडवू शकतात. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाच्या निमित्ताने, आपण सर्वांनी शिक्षणाच्या महत्त्वाची जाणीव ठेवून, समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिक्षण आणि साक्षरता यामुळेच आपला समाज खऱ्या अर्थाने समृद्ध आणि प्रगतिशील होऊ शकतो.

साक्षरता म्हणजे काय? मूळ अर्थ: केवळ सही करता येणे किंवा अक्षरांची ओळख असणे म्हणजे साक्षरता नव्हे, तर ज्ञानार्जनासाठी लिपीचा वापर करण्याची कार्यक्षमता म्हणजे साक्षरता होय. भारतात सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाची व्यक्ती किमान एका भाषेत लिहू, वाचू आणि बोलू शकत असेल तर त्याला साक्षर मानले जाते. साक्षरता म्हणजे एखाद्या व्यक्तीला कोणतीही एक भाषा लिहिता, वाचता आणि समजता येण्याची क्षमता होय.

साक्षरतेचे महत्त्व व व्यक्तिमत्त्व विकास: साक्षरतेमुळे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो आणि योग्य-अयोग्य समजण्याची क्षमता विकसित होते. प्रगतीचा मार्ग: निरक्षरता हा देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीमधील मोठा अडथळा आहे. साक्षर समाजामुळे देश आर्थिक व सामाजिक दृष्ट्या प्रगत होतो. जीवन कौशल्ये: साक्षरतेमध्ये आता डिजिटल साक्षरता, आर्थिक साक्षरता आणि आरोग्याची जागरूकता यांचाही समावेश होतो.

निरक्षरतेमागील कारणे:

देशाचा मोठा भाग अजूनही निरक्षरतेशी झुंजत आहे. अशा परिस्थितीत निरक्षरतेमागील कारण काय आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे:- १) कौटुंबिक मानसिकता: कौटुंबिक मानसिकता हे निरक्षरतेचे सर्वात मोठे कारण बनते कारण अजूनही भारतातील अनेक भागात असे पालक आहेत जे त्यांच्या सनातनी विचारसरणीने त्रस्त आहेत. ते अभ्यासाला व्यर्थ मानतात आणि त्याऐवजी मुलांना कामावर आणण्याला महत्त्व देतात. बहुतेक मुलींच्या बाबतीत असे घडते ज्यांच्या पालकांना वाटते की मुली अधिक शिकल्या तर हाताबाहेर जातील. २) पालकांची निरक्षरता: बरेच पालक स्वतः निरक्षर आहेत, त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व इतके चांगले समजत नाही आणि ज्या पालकांना आपल्या मुलांना शिक्षण द्यायचे असेल त्यांना हे देखील माहित नसेल की कृपया मुलांचे प्रवेश आणि इतर प्रक्रिया काय कराव्यात, कारण जे ते मुलांना शिकवू शकत नाहीत. ३) कौटुंबिक पाठिंब्याचा अभाव: अनेक मुलांना शिक्षण घ्यायचे असते परंतु पुरेशा कौटुंबिक पाठिंब्याअभावी ते त्यांचा अभ्यास पूर्ण करू शकत नाहीत. ४) गरिबी:- गरिबी हे निरक्षरतेचे एक मोठे कारण आहे, कारण अनेक पालक गरिबीमुळे आपल्या मुलांना शिक्षण देऊ शकत नाहीत. त्यामुळे निरक्षरतेच्या कारणांकडे लक्ष देऊन ते दूर करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

साक्षरता वाढवण्याचे मार्ग: देशभरात साक्षरता पसरवण्यासाठी विविध पद्धती अस्तित्वात आहेत, यापैकी बहुतांश पद्धती सरकार आणि विविध स्वयंसेवी संस्थांनी वापरल्या आहेत. साक्षरतेला चालना देण्यासाठी खालील काही मार्ग आहेत:- १) मोफत शिक्षण:- देशात असे अनेक लोक आहेत जे गरिबीमुळे शाळेची फी भरू शकत नाहीत आणि आपल्या मुलांना या शाळांमध्ये दाखल करू शकत नाहीत. त्यामुळे मुलांना मोफत शिक्षण देण्याची गरज आहे. याच भागात, सन १९९३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ''उन्नीकृष्णन निकाला''मध्ये १४ वर्षांपर्यंतच्या मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा संविधानाच्या कलम २१ अन्वये मूलभूत अधिकार म्हणून दिला. त्यानंतर सन २००३ मध्ये संविधानातील शिक्षणाच्या अधिकारांतर्गत मोफत शिक्षण देण्यात येऊ लागले. २ जागरूकता:- सतत शिक्षणाविषयी जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाने अनेक सरकारी, गैर-सरकारी आणि स्थानिक संस्थांद्वारे अनेक मोहिमा चालवल्या जातात. या मोहिमांचा फायदा असा आहे की ते आपल्या मुलांना शाळेत का पाठवणे महत्त्वाचे आहे याबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करतात. जनजागृतीतूनच शिक्षणाचे महत्त्व प्रत्येकाच्या मनात बिंबवले जाऊ शकते, म्हणूनच या जनजागृती मोहिमा वाढवणे आवश्यक आहे. ३) शिष्यवृत्ती:- शिष्यवृत्ती, अनुदान आणि अनुदानासारख्या योजना गरीब कुटुंबातील किंवा अत्यंत मागासलेल्या जातीतील मुलांसाठी लागू कराव्यात, कारण या योजनांमुळे मुलांना अधिक अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळेल. मात्र सध्या अशा अनेक योजना राबविल्या जात आहेत. मात्र खराब व्यवस्थेमुळे अनेक विद्यार्थ्यांना या सुविधांचा लाभ मिळत नाही. ४) मोफत पुस्तके :- मुलांमध्ये शिकण्यास प्रोत्साहन देण्यासाठी शाळांनी मोफत पुस्तकांचे वाटप करणे आवश्यक आहे. तसे, तर या सेवेचा लाभ सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. सरकारी शाळेतील मुलांना इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत मोफत पुस्तके दिली जातात, त्यानंतर त्यांना स्वतः पुस्तके खरेदी करावी लागतात. मात्र, खासगी शाळांमधील मुलांना ही सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे हे मुद्दे लक्षात घेऊन सरकारने धोरणे राबवली, तर देशात एकही मूल निरक्षर राहणार नाही, असे आपण म्हणू शकतो.

जागतिक साक्षरता दिवस

आंतरराष्ट्रीय स्तरावर निरक्षरता निमूलनाच्या उद्देशाने एक मोहीम राबविण्यात आली, जी आज आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस म्हणून आपल्यासमोर आहे. वास्तविक, युनेस्कोने सन १९६६ मध्ये याची सुरुवात केली होती, त्याचा उद्देश असा होता की सन १९९० पर्यंत कोणत्याही देशात कोणीही निरक्षर राहू नये. ही मोहीम सन १९९५ पर्यंत मागासलेल्या देशांमध्ये (भारताचाही यात समावेश आहे) राबविण्यात आली. लोकांचे प्रबोधन करण्याचा हा प्रयत्न स्तुत्य होता.

निष्कर्ष: लोकांना शिक्षित करण्यासाठी सरकारला अनेक नवीन नियम आणि योजना प्रकाशात आणाव्या लागतील. शासनाव्यतिरिक्त प्रत्येक सुशिक्षित नागरिक आपल्या स्तरावर लोकांना शिक्षण देऊ शकत असला, तरी विविध सरकारी आणि निमसरकारी संस्थांकडून शिक्षणासाठी मोहिमा राबवल्या जातात. मात्र या मोहिमांना गती देण्याची गरज आहे. लहानपणापासूनच मुलांमध्ये शिक्षणाची सवय लावण्यासाठी त्यांच्या सुरुवातीच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. आज अशा अनेक सरकारी शाळा आणि महाविद्यालये उपलब्ध आहेत जिथे मुलांना मोफत शिक्षण दिले जाते. लोकही त्यांचा लाभ घेऊ शकतात. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाच्या समस्त जनतेला हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**– संकलन व सुलेखन –**
**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**राह. श्रीगुरूदेव हरदेवकृपा निवास, एकता चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष– ९६९९८३६७१७.**

# पोलिस सहकार्य : पोलिस- जनता निर्भीड सुसंवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**( ७–१३ सप्टेंबर: आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार्य दिन सप्ताह.)**

आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार दिन दरवर्षी ७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिनाचा उद्देश जगभरातील पोलीस संस्थांमध्ये सहकार्य वाढविणे, माहितीची देवाणघेवाण करणे आणि जागतिक सुरक्षेसाठी एकत्र काम करण्याची भावना बळकट करणे हा आहे. विविध देशांतील पोलीस संघटनांमध्ये सुसंवाद, एकत्रित योजना आणि गुन्हेगारीविरोधात सामूहिक प्रयत्नांच्या महत्त्वावर या दिवशी भर दिला जातो. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर मार्गदर्शक संकलित लेख वाचकांना समर्पित जी... संपादक.

आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या पोलिसांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे गुन्हेगारीच्या नेटवर्कला उध्वस्त करण्यासाठी, मानव तस्करी, दहशतवाद, ड्रग तस्करी, सायबर गुन्हेगारी इत्यादी समस्यांवर प्रभावीपणे उपाययोजना करता येतात. या सहकारामुळे आंतरराष्ट्रीय सुरक्षेला बळकटी येते आणि विविध देशांतील नागरिकांच्या जीवनात सुरक्षितता नांदते. या दिवसाचे औचित्य साधून, पोलीस अधिकारी आणि संस्थांना त्यांच्या अतुलनीय कार्यासाठी सन्मानित केले जाते. आंतरराष्ट्रीय पोलीस सहकार दिन पोलीस संस्थांच्या एकत्रित शक्तीवर भर देतो, ज्यामुळे गुन्हेगारी विरोधातील लढाई अधिक प्रभावी ठरते. याचा परिणाम म्हणून जागतिक स्तरावर शांतता आणि सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी पोलीस यंत्रणांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. पोलीस आणि जनता यांच्यातील सहकार्य ही कोणत्याही समाजातील कायदा, सुव्यवस्था आणि शांतता टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. पोलिसांचे काम केवळ गुन्हेगारांना पकडणे नसून, जनतेच्या सहकार्याने गुन्हेगारीला प्रतिबंध करणे होय. पोलीस सहकार्याचे मुख्य उपक्रम: महाराष्ट्र पोलिसांनी नागरिकांना सुरक्षिततेच्या कामात सहभागी करून घेण्यासाठी काही महत्त्वाच्या यंत्रणा उभारल्या आहेत– १ ग्रामसुरक्षा दल: ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी गस्त घालण्यासाठी आणि चोऱ्या किंवा मालमत्तेचे गुन्हे रोखण्यासाठी स्थानिक नागरिकांचे हे दल पोलिसांना मदत करते. २ मोहल्ला एकता समिती: शहरी व संवेदनशील भागांमध्ये विविध धर्मांच्या आणि जातींच्या लोकांचा यात समावेश असतो. सलोखा राखणे आणि अफवांना आळा घालणे हे याचे कार्य असते. ३ ट्रॅफिक वॉर्डन आणि आरएसपी. : वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी सामान्य नागरिक 'ट्रॅफिक वॉर्डन' म्हणून तर शाळकरी मुले रोड सेफ्टी पॅट्रोल (ठडझ) अंतर्गत वाहतूक व्यवस्थापनात पोलिसांना सहकार्य करतात. ४ जनतेने पोलिसांना सहकार्य का करावे? गुन्ह्यांचा जलद तपास: पोलिसांना आजूबाजूला घडणाऱ्या संशयास्पद घटनांची किंवा गुन्ह्यांची माहिती त्वरित दिल्यास गुन्हेगारांना पकडणे सोपे होते. ५ सायबर गुन्हेगारीवर नियंत्रण: आजकाल वाढणाऱ्या ऑनलाईन फसवणुकीच्या घटनांमध्ये सतर्क राहून पोलिसांकडे तक्रार केल्यास इतरांची फसवणूक टाळता येते. ६ सण व उत्सवांमध्ये शांतता: गणेशोत्सव, दिवाळी, किंवा निवडणुकांदरम्यान स्थानिक मंडळांनी आणि नागरिकांनी नियमांचे पालन केल्यास कायदा व सुव्यवस्था राखणे सोपे जाते. ७ पोलिसांकडून नागरिकांना मिळणारे सहकार्य: नागरिकांचा पोलिसांवर विश्वास वाढावा म्हणून पोलीस दलातर्फेही अनेक पावले उचलली जातात: दिलासा आणि समुपदेशन: कौटुंबिक वाद, पळून गेलेली मुले किंवा निराधार महिलांना आधार देण्यासाठी पोलीस विविध स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने समुपदेशन करतात. ८ आपत्ती व्यवस्थापन: पूर, भूकंप किंवा कोरोनासारख्या महामारीच्या काळात पोलीस स्वतःचा जीव धोक्यात घालून नागरिकांना अन्न, औषधे आणि मदत पोहोचवण्याचे कार्य करतात. ९ सेवा उपक्रम: पोलीस ठाण्यात येणाऱ्या तक्रारदारांची ऑनलाईन नोंदणी करून, त्यांच्या तक्रारीचे निवारण झाले की नाही याचा फीडबॅक घेतला जातो.

१० पोलीस–जनता सुसंवाद: नागरिकांनी पोलिसांकडे 'मित्र' म्हणून पहावे आणि मनात कोणतीही भीती न ठेवता माहिती द्यावी. कोणत्याही अफवेवर विश्वास न ठेवता थेट पोलिसांशी संपर्क साधावा. आणीबाणीच्या प्रसंगी डायल १०० किंवा ११२ या हेल्पलाइन क्रमांकाचा वापर करावा. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! आंतरराष्ट्रीय पोलिस सहकार्य दिन सप्ताह निमित्त हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**– संकलन व सुलेखन –**
**श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजी.**
**(दिनविशेषकार)**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष– ९६९९८३६७१७.**

## कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांचा मंदिर समितीमधील सेवापूर्ती बाबत सन्मान

# सेवा कार्याला आधुनिकतेची जोड देणारे अधिकारी : राजेंद्र शेळके

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरीच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराची सेवा ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून, लाखो भाविकांच्या श्रद्धेशी जोडलेले एक पवित्र कर्तव्य आहे. या भावनेतून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे कार्यकारी अधिकारी म्हणून सन २०२३ मध्ये नियुक्त झालेले उपजिल्हाधिकारी राजेंद्र शेळके यांनी आपल्या तीन वर्षांच्या कार्यकाळात मंदिर समितीच्या प्रशासनाला आधुनिक, पारदर्शक आणि भाविककेंद्री दिशा देण्याचे उल्लेखनीय कार्य केले.



कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर तसेच परिवार देवता मंदिरांच्या जतन व संवर्धनाच्या कामास प्रत्यक्ष सुरुवात करून मंदिरांच्या ऐतिहासिक व धार्मिक वारशाच्या संवर्धनाला प्राधान्य दिले. पंढरीच्या या प्राचीन तीर्थक्षेत्राचे वैभव पुढील पिढ्यांसाठी जतन व्हावे, हा त्यांच्या कार्यपद्धतीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू राहिला. भाविकांच्या दर्शन व्यवस्थेतही त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले. व्हीआयपी दर्शनावर निर्बंध आणून सर्वसामान्य भाविकांना सुलभ दर्शन मिळावे, यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्याचबरोबर टोकन दर्शन प्रणाली सुरू करून दर्शन व्यवस्थेत शिस्त, पारदर्शकता आणि नियोजन आणण्यात आले. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करत भाविकांना विविध धार्मिक सेवा घरबसल्या उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ऑनलाइन पद्धतीने पूजा उपलब्ध करून देण्यात आल्या. भक्तनिवासातील खोल्यांच्या बुकिंगसाठी संगणकीकृत प्रणाली विकसित करण्यात आली. दर्शन रांगेतील भाविकांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी जर्मन हँगर तसेच अत्याधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

भविष्यातील भाविकांची वाढती संख्या आणि पंढरपूरच्या तीर्थक्षेत्राचा विस्तार लक्षात घेऊन स्कायवॉक व दर्शन हॉलच्या बांधकामास सुरुवात करण्यात आली. ही कामे केवळ बांधकामे नसून भविष्यातील दर्शन व्यवस्थेची पायाभरणी करणारी महत्त्वपूर्ण पावले आहेत. संत तुकाराम महाराजांनी विठ्ठल भक्तीबरोबरच कर्म, सेवा आणि समाजहिताचा संदेश आपल्या अभंगातून दिला. त्यांच्या शब्दांत,

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।झ

या संतविचाराचा अर्थच असा की, ज्यांच्या सेवेत समाजाचे आणि सामान्य माणसाचे हित आहे, तेथेच खरी ईश्वरसेवा आहे. याच भावनेतून राजेंद्र शेळके यांनी आपल्या कार्यकाळात भाविकांच्या सोयी-सुविधांना केंद्रस्थानी ठेवून अनेक निर्णय घेतले, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांच्या कार्यकाळातील आणखी एक ऐतिहासिक आणि अभिमानास्पद बाब म्हणजे मंदिर समितीच्या इतिहासात पहिल्यांदाच चार आषाढी यात्रांचे नियोजन करण्याचे भाग्य त्यांना लाभले. लाखो वारकरी आणि भाविकांच्या उपस्थितीत होणाऱ्या आषाढी यात्रेचे नियोजन करणे हे प्रशासनासमोरील मोठे आव्हान असते. मात्र विविध विभाग, अधिकारी, कर्मचारी आणि यंत्रणांच्या समन्वयातून त्यांनी या जबाबदारीचे यशस्वीपणे वहन केले.

कर्मचारी वर्गाच्या हिताचाही त्यांनी आपल्या कार्यकाळात गांभीर्याने विचार केला. कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याची महत्त्वपूर्ण कार्यवाही त्यांच्या कार्यकाळात झाली. तसेच भाविकांना धार्मिक सेवांमध्ये सहभागी होता यावे, यासाठी तुळशी अर्चन पूजा सुरू करण्यात आली आणि नित्य पूजेमध्ये दोन भाविकांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. मंदिर समितीच्या विविध विभागांना आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवून संस्थेची नियुक्ती करण्यात आली. आधुनिक व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शकता आणि कार्यक्षमता या बाबींना त्यांनी आपल्या प्रशासकीय कार्यपद्धतीत महत्त्व दिले.

मंदिर जतन-संवर्धन, भाविकांसाठी सुलभ दर्शन व्यवस्था, ऑनलाइन धार्मिक सेवा, भक्तनिवासाचे संगणकीकरण, अत्याधुनिक दर्शन सुविधा, स्कायवॉक व दर्शन हॉलसारखे विकास प्रकल्प, आषाढी यात्रेचे नियोजन, कर्मचारी कल्याण आणि मनुष्यबळ व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रांत त्यांनी केलेले काम त्यांच्या कार्यकाळाची आेळख ठरले आहे. सन २०२३ मध्ये तीन वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्त झालेले राजेंद्र शेळके यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर शासनाने त्यांची कल्याण, जिल्हा ठाणे येथे प्रांताधिकारी म्हणून बदलीने पदस्थापना केली आहे.




त्यांच्या जागी मंत्रालयातील कक्ष अधिकारी श्रीकांत यादव यांची श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती तसेच कर्मचारी संघटनेच्या वतीने राजेंद्र शेळके यांचा आज भावपूर्ण सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख, कर्मचारी व कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

तीन वर्षांचा कार्यकाळ संपला असला, तरी पंढरीच्या विठुरायाच्या सेवेत त्यांनी घेतलेले निर्णय, सुरू केलेली विकासकामे आणि प्रशासनाला दिलेली नवी दिशा ही त्यांच्या कार्याची कायम स्वरूपी ओळख राहणार आहे. पंढरीच्या सेवेत काम करण्याची संधी हीच एक मोठी भाग्याची गोष्ट आहे. त्या सेवेत आपल्या कार्याची सकारात्मक छाप उमटवून राजेंद्र शेळके आता नव्या प्रशासकीय जबाबदारीकडे मार्गस्थ होत आहेत. श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या चरणी प्रार्थना व त्यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीस यश, समाधान आणि उत्तरोत्तर प्रगती लाभो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा!

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble


■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# रेवणसिद्धेश्वर महाराजांचा पालखी, रथोत्सव मोठ्या भक्तीभावाने उत्साहात साजरा

## पारंपरिक वाद्याच्या गजरात निघाली मिरवणूक, पालखी सोहळ्याला भाविकांची गर्दी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : श्रावण महिन्यामध्ये निघणाऱ्या जगद्गुरु श्री रेवणसिद्धेश्वर महाराजांची पालखी व रथोत्सवाची शेवटच्या रविवारी मोठ्या भक्तीभावाने सांगता झाली. याप्रसंगी सकाळी राज्यसभाचे खासदार प्रा.डॉ. ज्योतीताई वाघमारे, प्राचार्य गजानन धरणे, नगरसेवक प्रियदर्शन साठे व सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष श्री.दशरथ वडतिले यांच्या शुभहस्ते पालखीचे पूजन संपन्न झाले.त्यानंतर पारंपारिक वाद्य वाजवत मोठ्या भक्तीभावाने ही मिरवणूक जोडभावी पेठेतील चिद्रे वाडा येथून, कुंभारवेस, मंगळवार पेठ, मधला मारुती, आजोबा गणपती, विजापूर वेस, गुरु भेट, सात रस्ता मार्गे विजापूर रोड येथील रेवनसिद्धेश्वर मंदिरात दुपारी पोहोचली, त्यानंतर महाआरती होऊन महाप्रसादाचे वाटप झाले.त्यानंतर सायंकाळी श्री गुरुभेट मंदिर येथून रथाची मिरवणूक मोठ्या थाटामाटात निघाली मिरवणुकीत हत्तीवर जगद्गुरु रेवणसिद्धेश्वर महाराजांची जिवंत प्रतिकृती साकरण्यात आले होती.अथर्व ढोल पथकाने सर्वांचे लक्ष वेधले.

यावेळी उदय चाकोते, सुदीप चाकोते, राजशेखर हिरेहब्बू, नरेंद्र गंभीरे, निलेश ठोकडे सिद्धेश्वर मुनाळे, शिवराज म्हेत्रे, दिपक आर्वे, बसवराज, मनीष काळजे यांच्या शुभहस्ते रथाचे पूजन झाले.

याप्रसंगी रेवणसिद्धेश्वर समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष श्री. गंगाधर यादवाड, गिरमलप्पा हिंगमिरे, सिद्धेश्वर दुलंगे, अशोक चाकोते, राजशेखर दुलंगे, शिवानंद ख्याडे, ऍड मल्लिनाथ राचेटी, बसवराज हिंगमिरे, सागर अतनूरे, आशिष दुलंगे, मल्लिनाथ सोलापुरे, गुरुराज पडमगोंडा, सतीश परेल्ली, आंनद खटके, केतन वारद, शिवानंद सुलतानपूरे, भागेश ख्याडे, चिदानंद बगले,रोहित बिद्री, ऋषिकेश हिंगमिरे, बबलू परचंडे, शीतल निकम,बसवराज काटगावकर, अध्यक्ष श्रीशैल जकापुरे, सुरज कोरे, शरण बिराजदार, बसवराज आवटी, सुरेश धनश्री, मंथन चिडगुंपी, सुभाष कलशेट्टी ऋतुराज वाघमोडे, संकेत अल्लोळी, शुभम वडतीले, अभिजित तांडूरे, ऋषभ चारी, मल्लिकार्जुन करजगी, रामचंद्र हिंगमिरे, वरद होमकर, योगीनाथ हुबळीमठ, शशांक दुलंगे, ओंकार हवले, प्रशांत राऊर, सिद्धारुढ निंबाळे आदी उपस्थित होते.

# टाकळीवाडी परिसरात बाप्पांच्या आगमनासाठी तरुण मंडळांची लगबग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : गणरायाच्या आगमनाला अवघे काही दिवस उरले असून गावातील विविध तरुण मंडळांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बाप्पांच्या स्वागतासाठी मंडळांच्या कार्यकर्त्यांची जोरदार तयारी सुरू असून, मंडप उभारणी, आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई तसेच देखाव्याच्या कामांना वेग आला आहे.

गणेशोत्सवात यंदा सामाजिक संदेश देणारे आणि संस्कृतीचे दर्शन घडविणारे देखावे साकारण्यावर अनेक मंडळांचा भर आहे. त्यासाठी तरुण कार्यकर्ते दिवसरात्र मेहनत घेत आहेत. मंडपाच्या सजावटीपासून ते गणेशमूर्तीच्या स्वागताची तयारी करण्यापर्यंत प्रत्येक कामात तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येत आहे.

गणरायाच्या आगमनाची आतुरता नागरिकांमध्येही वाढली असून, बाजारपेठांमध्ये गणेशोत्सवाच्या साहित्याची खरेदी सुरू झाली आहे. ढोल-ताशा पथकांच्या सरावामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदाचा गणेशोत्सव उत्साहासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारा आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचा संकल्प अनेक मंडळांनी केला आहे. त्यामुळे बाप्पांच्या आगमनाची चाहूल लागताच शहरातील तरुणाई गणेशोत्सवाच्या तयारीत दंग झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# सातारची पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांना विशेष सेवा पदक ; धाडसी नेतृत्व आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखल्याबद्दल त्यांच्या उल्लेखनीय सेवेचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : गडचिरोली व गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्ह्यामध्ये नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायांना परिणामकारकपणे आळा घालण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय आणि यशस्वी कार्यवाही बद्दल सातारचे पोलीस अधीक्षक व आयपीएस निखिल एन. पिंगळे यांना विशेष सेवा पदक प्रधान करण्यात आले आहे. नक्षलग्रस्त भागात कार्यरत असताना नक्षल विरोधी मोहिमेमध्ये धाडसी नेतृत्व उल्लेखनीय कामगिरी आणि कर्तव्यनिष्ठ सेवा या बजावण्याबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच नक्षलवादीच्या कारवायांना प्रभावी घालण्यासाठी बजावलेल्या भूमिकेबद्दल त्याची दखल घेत त्यांना हा विशेष सेवा पदक बहाल करण्यात आले आहे शौर्य समर्पण आणि कर्तव्यनिष्ठेची हा गौरव असून सातारा जिल्ह्याच्या पोलिस दलासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सातारा सह विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहे.

# सोलापूर जिल्ह्यात तातडीने दुष्काळ जाहीर करा, संकटग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत द्या : खासदार प्रणिती शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : मोहोळ तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती खासदार प्रणिती शिंदे यांची प्रत्यक्ष पाहणी जुळून चाललेल्या पिकाची तातडीने पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश,

मोहोळ सोलापूर जिल्ह्यात पावसाची दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके गंभीर संकटात आली असून निसर्गाच्या कृपेमुळे बळीराजा पूर्णपणे हवा देत झाला आहे मान्सूनच्या सुरुवातीला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली मात्र त्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने अनेक ठिकाणी पिके जळून जात आहेत हातात तोंडाशी आलेली पिके डोळ्यासमोर करपताना पाहून शेतकऱ्यांची स्वप्नही जळून चालली आहे.

तर गंभीर परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी सोलापूर च्या खासदार प्रणिती शिंदे यांनी मोहोळ तालुक्यातील पाठवून पुणे शहर डिकसळ आणि भैरववाडी या गावांना भेट देत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाण्याअभावी जळून चाललेल्या पिकांची पाहणी केली विशेषता पावसाळी करपलेल्या सोयाबीन सह अन्य पिका खरीप पिकाची स्थिती पाहून त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

यावेळी खासदार पणती शिंदे यांनी प्रशासनाचा तातडीने पिकाची पंचनामे करून शेतकऱ्यांच्या नुकसानीचा अहवाल तयार करण्याची प्रशासनाला निर्देश दिले आहेत. तसेच पावसाअभावी निर्माण झालेली गंभीर परिस्थिती शासनाने तातडीने दखल घेऊन सोलापूर जिल्हा दुष्काळ जाहीर करून साखर कष्ट शेतकऱ्यांना भरीव मदत द्यावी अशी ही मागणी त्यांनी शासनाकडे केली आहे.

मोसंबी आता तोंडाची आलेली पिके डोळ्यासमोर जुळून जात असताना शेतकरी मोठ्या संकटात आहे या दुःखाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहावे हीच खरी एकजूट आहे प्रत्येक गावातील शेतकऱ्यांच्या पाठीशी मी ठामपणे उभे असून त्यांना शासनाकडून योग्य मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार आहे अशी ही ग्वाही खासदार शिंदे यांनी दिली.

खासदार शिंदे यांच्या दौऱ्यानिमित्त विविध विकास कामांची मागणी त्यांच्यासमोर मांडल्या व शिरापूर उपसा सिंचन योजनेची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावी खुनेश्वर भागात उजनीचे पाणी मिळावे तसेच मलाच्या कठड्याची दुरुस्ती करून नादुरुस्त रस्ता तातडीने दुरुस्त करावा अशा मागण्या ग्रामस्थांनी केल्या रस्ता खराब झाल्यामुळे एसटी बसला ही बंद झाल्याने नागरिकांची मोठी गैर्य होत असल्याचे यावेळी निदर्शनास आणून देण्यात आले.

खासदार प्रणिती शिंदे यांनी सर्व मागण्यांची दखल घेत संबंधित विभागाकडे पाठपुरा करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.

यावेळी तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार लक्ष्मण मगर मोहन चव्हाण चंद्रहार चव्हाण शंकर चव्हाण बाळासाहेब आतकरे विकास पाटील ब्रह्मदेव चव्हाण मगर सरपंच वसंत चव्हाण राम हरी जाधव संभाजी मराठी अशोक खोत बजरंग पाटील महादेव आशिष खोत विकास चव्हाण नवनाथ गाडगे बजरंग पाटील युवराज रणदिवे रणजीत धावणे राजेंद्र मोरे रूपाली अडसूळ संभाजी सातपुते दत्ता सावंत शिवाजी वसेकर वीर सेना देशमुख भैया लोंढे गुरुजी यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा पंढरपूरची पदाधिकारी व कार्यकारी सदस्याची बैठक खेळमेळीच्या वातावरणामध्ये संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : प्रतिनिधी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा पंढरपूरचे बैठक संघाचे मार्गदर्शक राधेशजी बादले -पाटील यांच्या अध्यक्ष खाली पत्रकार संघाचे इंदिरा गांधी चौक येथील असणाऱ्या पत्रकार भवन या ठिकाणी नुकतीच खेळण्याच्या वातावरणामध्ये संपन्न झाली. या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई या संघटनेच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी श्री राजेंद्रजी कोरके - पाटील यांची पुनश्च नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा व श्री नितीन कृष्णराव करंडे यांची सोलापूर जिल्हा सरचिटणीस भारतीय जनता पार्टी सोलापूर किसान मोर्चा या पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा आणि श्री विक्रम कदम वकील ही पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मान या बैठकीचे अध्यक्ष राधेशजी बादले - पाटील यांच्या शुभहस्ते हार श्रीफळ देऊन करण्यात आला.

यावेळी या बैठकीमध्ये येणाऱ्या गणेशोत्सव मध्ये संघटनेच्या वतीने विविध कार्यक्रम राबवण्याच्या दृष्टिकोनातून चर्चा करण्यात आले. त्याचप्रमाणे संघटनेच्या वतीने भविष्यामध्ये विविध सामाजिक कार्यक्रम राबवण्याच्या दृष्टिकोनातूनही या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.

या बैठकीसाठी संघटनेचे पदाधिकारी एज शहराध्यक्ष शंकर कदम सचिव कुमार कोरे मार्गदर्शक प्रमोदजी भोसले महेश कदम अतुल मोरे सुनील आधटराव रामदास नागटिळक संतोष मोरे संजय ननवरे गणेश माने बाळासाहेब काशीद राजेंद्र करपे अण्णा पवार शरद कोरे सामाजिक कार्यकर्ते उमेश इशारा अदि पदाधिकारी कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

## शिक्षक दिना निमित्त मोरे महाविद्यालयात एक दिवस विद्यार्थ्यांचे कामकाज उपक्रम संपन्न

# ‘शिक्षक विद्यार्थ्यांचे भविष्य घडवतो’ : प्राचार्य डॉ. व्ही. बी. काळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : शिक्षण ही केवळ पदवी मिळवण्याची प्रक्रिया नसून व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे. आज महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी एक दिवस शिक्षक आणि प्रशासकाची भूमिका निभावली, यातून तुम्हाला जबाबदारीची खरी जाणीव झाली असेल. शिक्षक हा केवळ चार भिंतींच्या आत पुस्तकी ज्ञान शिकवत नाही, तर तो कृतीयुक्त संस्कारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे संपूर्ण आयुष्य घडवत असतो.

आजच्या अनुभवातून विद्यार्थ्यांनी शिस्त, समयसूचकता आणि निर्णयक्षमतेचे धडे गिरवले आहेत, जे त्यांच्या भावी जीवनात अत्यंत मोलाचे ठरतील, प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. बी. काळे यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाचे, निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ०५ सप्टेंबर रोजी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुणांचा विकास व्हावा, प्रशासकीय कामकाजाची समज यावी आणि शिक्षकांच्या निरंतर त्यागाचे मोल कळावे, या उदात्त उद्देशाने महाविद्यालयात ‘एक दिवस विद्यार्थ्यांचे कामकाज’ हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यात विद्यार्थिनी कु. चैताली शिंदे हिने प्राचार्या तर कु.अक्षरा जाधव हिने उपप्राचार्या म्हणून जबाबदारीने महाविद्यालयाची धुरा सांभाळली. विद्यार्थी शिक्षकांनी सर्व प्रशासकीय बैठका, शैक्षणिक नियोजनाचा आढावा, प्राध्यापकांशी संवाद, आणि वर्गावरील अध्यापन यांसारख्या जबाबदाऱ्या लीलया पूर्ण केल्या.

या प्रसंगी विविध शाखेतील कु.पूजा गवळी, तेजश्री जानराव, अक्षरा तैवार, समीक्षा आरोटे, शुभांगी गवळी व वर्षा सानप यांनी मनोगत व्यक्त करत शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी सकाळ सत्र प्रमुख डॉ. डी. टी. ढगे आणि कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. ए. एस. वडघुले यांनी मनोगतात विद्यार्थ्यांच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आणि शिस्तबद्धतेचे विशेष कौतुक करत सर्वांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी सर्व विद्यार्थी शिक्षक आणि महाविद्यालयीन शिक्षक या सर्वांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. यशस्विनी कराड हिने केले, तर आभार कु. क्रांती काळे हिने मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागामुळे हा शिक्षक दिन संस्मरणीय ठरला.



# सचिन कल्याणशेट्टी, सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख एकत्रित ; जगद्गुरूंच्या सानिध्यात आल्या खासदार ताई ही

## होटगी मठाच्या पंचमुखी परमेश्वर मंदिरात धार्मिक कार्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : यंदाच्या श्रावण महिन्यात सोलापूरच ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर यांच्या मंदिरापेक्षा होटगी मठाच्या पंचमुखी परमेश्वर मंदिराला राजकीय महत्त्व प्राप्त झाल्याचे पाहायला मिळते. याच ठिकाणी खासदार प्रणिती शिंदे, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी एकत्रित एका श्रावण सोमवारी पूजा केली होती. त्यानंतर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे हे सुद्धा या मंदिरात जाऊन जगद्गुरु डॉक्टर मल्लिकार्जुन शिवाचार्य यांचे आशीर्वाद घेतले.

या दोन्ही पूजेचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.

दरम्यान अतिशय दुर्मिळ असा योग याच पंचमुखी परमेश्वर मंदिरात शेवटच्या श्रावण सोमवारी पाहायला मिळाला. एकाच पक्षात राहून वैयक्तिक राजकीय मतभेद असलेले आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार सुभाष देशमुख, आमदार विजयकुमार देशमुख हे तीनही भाजपचे आमदार एकत्र पाहायला मिळाले. यांच्यासोबतच राज्यसभेच्या खासदार ज्योती वाघमारे या सुद्धा दिसून आल्या.

माहिती घेतली असता, डॉक्टर मल्लिकार्जुन शिवाचार्य यांनी या सर्वच नेत्यांना रविवारी रात्री अचानकच निरोप देऊन सोमवारी आपल्या मंदिरात बोलून घेतल्याचे समजले. डॉक्टर विजयकुमार देशमुख हे आपले चिरंजीव डॉक्टर किरण देशमुख व त्यांच्या सुनबाई सोबत या ठिकाणी आले होते. सुभाष देशमुख एकटेच पाहायला मिळाले. सचिन कल्याणशेट्टी मात्र आपल्या पत्नी जिल्हा परिषद सदस्य शांभवी कल्याणशेट्टी यांच्यासोबत या ठिकाणी दर्शनाला आले होते.

तसेच खासदार ज्योती वाघमारे या सुद्धा या नेत्यांच्या सोबत दिसून आल्या.

पूर्वी आमदार सुभाष देशमुख यांचे समर्थक मानले जाणारे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्यासोबत काहीसे जुळत नसल्याचे पाहायला मिळत होते. त्यानंतर बाजार समितीच्या निवडणुकीत सचिन कल्याणशेट्टी सुभाष देशमुख यांच्यात राजकीय कटुता आली त्यावेळी सुभाष देशमुख आणि विजय देशमुख एकत्र आले. दरम्यानच्या काळात एकावेळी जगद्गुरु डॉक्टर मल्लिकार्जुन शिवाचार्य यांनी सचिन कल्याणशेट्टी यांनी विजयकुमार देशमुख यांना एकत्र बोलावून घेतल्याचे पाहायला मिळाले. दोघांच्या गळ्यात एकच पुष्पमला सुद्धा त्यावेळी दिसून आली होती.

आता पुन्हा हे तीनही भाजपचे एकमेका विरुद्ध कटूता निर्माण झालेले नेते पुन्हा एकत्र दिसल्याने सोलापूरच्या राजकीय वर्तुळात पुढील काय दिवस जोरदार चर्चा ऐकण्यास मिळेल या शंका नाही.

# संकल्प हॉलीबॉल क्लब विजेता




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : कोल्हापूर येथे स्टुडन्ट ऑलिम्पिक असोसिएशन ने घेतलेल्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये कळंबच्या संकल्प वॉलीबॉल च्या मुलींनी रायगडच्या संघाला हरवून विजय प्राप्त केला व सर्व मुलींना गोल्ड मेडल मिळाले कळंबच्या संघामध्ये तनवी टोपे, सृष्टी टोपे, साक्षी काळे ,माहेश्वरी जमादार ,स्नेहा थोरबोले, प्रीती कवडे, सारिका कांबळे, प्रतीक्षा गायकवाड, आणि आकांक्षा पंडित या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरीचे दर्शन घडवले संकल्प हॉलीबॉल क्लब च्या या यशामुळे सर्व स्तरांमधून त्यांचं खूप खूप कौतुक आणि अभिनंदन होत आहे संकल्प वॉलीबॉल क्लबचे प्रशिक्षक रतन काका उबाळे आणि विद्याताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली मुलींचा संघ राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्पर्धा खेळत आहे स्टुडन्टऑलिंपिक असोसिएशनने घेतलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावल्या बद्दल या संघाची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे राष्ट्रीय स्पर्धा पुढच्या महिन्यामध्ये हरियाणाला होणार आहे.

# धाराशिव जिल्ह्यातील बंद पडलेला 'गुरुगौरव' पुन्हा सुरू होणार का?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव प्रतिनिधि/सुधाकर रणदिवे : जिल्ह्यातील ग्रामीण, वाडी-वस्ती व तांड्यांवरील शाळांमध्ये प्रतिकूल परिस्थितीत ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या गुणवंत, उपक्रमशील व विद्यार्थीप्रिय शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी दिला जाणारा तालुकास्तरीय शिक्षक पुरस्कार मागील काही वर्षांपासून अनेक ठिकाणी बंद असल्याने शिक्षक वर्गातून नाराजी व्यक्त होत आहे. बंद पडलेली 'गुरुगौरव'ची परंपरा पुन्हा सुरू करावी, अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात संघटनेचे प्रदेश सरचिटणीस संतोष भोजने यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदन देऊन धाराशिव जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना शिक्षक पुरस्कार सुरू करण्याबाबत आवश्यक आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे.

ग्रामीण भागातील शिक्षक शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवितात. विद्यार्थ्यांना कला, क्रीडा व शिष्यवृत्ती परीक्षेत प्राविण्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात. तसेच शासनाच्या विविध शैक्षणिक योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यात शिक्षकांची महत्त्वाची भूमिका असते. अशा शिक्षकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सार्वजनिक सन्मान केल्यास त्यांना अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल, असे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. या निमित्ताने प्रत्येक तालुक्यात गुणवंत व कर्तृत्ववान शिक्षकांचा तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**सर्व तालुक्यांसाठी एकसमान निकषांची मागणी**

पुरस्कार निवड प्रक्रिया पारदर्शक आणि गुणवत्ताधारित असावी. शिक्षकांचे नाविन्यपूर्ण शैक्षणिकउपक्रम, विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, कला-क्रीडा व शिष्यवृत्ती परीक्षेतील यश, सामाजिक बांधिलकी तसेच शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी या बाबींचा पुरस्कार निवडीत विचार करण्यात यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

> **गुणवंत शिक्षकांच्या सन्मानासाठी सर्व तालुक्यांना आदेश देण्याची राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाची मागणी**

जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना याबाबत स्पष्ट निर्देश देऊन दरवर्षी शिक्षक दिनानिमित्त शिक्षक पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

(जिल्ह्यात केवळ धाराशिव पंचायत समितीनेच शिक्षकांचा गौरव केला आहे. उर्वरित तालुके कधी पुरस्कार देणार आहेत याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे)

गुणवंत शिक्षकांचा सन्मान हा केवळ एका शिक्षकाचा गौरव नसून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा गौरव आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये बंद पडलेली 'गुरुगौरव'ची परंपरा पुन्हा सुरू करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा संतोष भोजने, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ यांनी व्यक्त केली आहे.

# अक्कलकोट तालुक्यात दुष्काळ जाहीर करून सरसकट मोफत धान्य, रोजगार व जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करा



> **रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (एकतावादी)ची तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे मागणी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. शेतकरी, शेतमजूर, कामगार, अल्पभूधारक तसेच सर्वसामान्य कुटुंबांसमोर अन्न, पाणी, रोजगार आणि जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (एकतावादी) च्या वतीने अक्कलकोट तहसीलदार मा मगर यांना निवेदन देऊन तातडीने दुष्काळी उपाययोजना राबविण्याची मागणी विकीबाबा नारायण चौधरी प्रदेशाध्यक्ष, रोजगार आघाडी तथा सोलापूर जिल्हाध्यक्ष रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (एकतावादी) यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

पावसाअभावी शेतीचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून ग्रामीण भागातील नागरिकांच्या उपजीविकेवर त्याचा थेट परिणाम होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन केवळ कागदोपत्री पाहणी न करता प्रत्यक्ष गावपातळीवर तातडीने उपाययोजना सुरू कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

प्रमुख मागण्या :

अक्कलकोट तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन आवश्यक ती अधिकृत दुष्काळी उपाययोजना सुरू करावी.

प्रत्येक गावातील अल्पभूधारक शेतकरी व सर्वसामान्य गरजू कुटुंबांना सरसकट मोफत धान्य उपलब्ध करून द्यावे.

मजूर व कामगारांना तातडीने पुरेसा रोजगार उपलब्ध करून देऊन रोजगाराच्या कामांचे प्रमाण वाढवावे.

पाणी व चाऱ्याच्या अभावामुळे अडचणीत येणाऱ्या पशुधनासाठी प्रत्येक आवश्यक गावात जनावरांच्या चारा छावण्या सुरू कराव्यात.

पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झालेल्या गावांमध्ये तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा. तसेच आवश्यक त्या ठिकाणी विहीर, बोअरवेल दुरुस्ती व इतर पाणीपुरवठ्याच्या उपाययोजना कराव्यात.

दुष्काळी परिस्थिती गंभीर झाल्यास ग्रामपातळीवर नियंत्रण कक्ष व तक्रार निवारण यंत्रणा सक्रिय करून नागरिकांना तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी.

टंचाईग्रस्त गावांना टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा तातडीने सुरू करून आवश्यकतेनुसार टँकरची संख्या वाढवावी.

नागरिकांच्या मूलभूत हक्कांशी तडजोड सहन केली जाणार नाही.

दुष्काळी परिस्थितीत शेतकरी, शेतमजूर, कामगार, सर्वसामान्य नागरिक आणि पशुधन यांच्यावर कोणत्याही प्रकारची उपासमार अथवा पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने वरील सर्व उपाययोजना तातडीने आणि प्रभावीपणे राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी. अन्यथा नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही व कायदेशीर मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

याप्रसंगी तालुका शेतकरी संघटना आरपीआय एकतावादी अध्यक्ष पांडुरंग जाधव आरपीआय एकतावादी आरपीआय एकतावादी मजूर आघाडी अध्यक्ष गुंडू कुंभार शेतकरी संघटना सचिव दाजी चव्हाण सद्दाम नदाफ विठोबा कोळेकर कार्यकर्ते उपस्थित होते.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या पुढाकारातून 'ज्ञान माऊली' हा उपक्रम

# स्वेरीमध्ये संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माचे ७५० वे वर्ष उत्साहात साजरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : समाजात प्रेम, समता, बंधुभाव आणि मानवतेचा संदेश पोहोचविण्याच्या उद्देशाने 'ज्ञान माऊली' हा उपक्रम राज्याच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्माचे ७५० वे वर्ष राज्यभर मोठ्या उत्साहात साजरे करण्यात येत असून, राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने पुणे महसूल विभागातील सर्व तालुक्यांमध्ये एकाच दिवशी, एकाच वेळी 'ज्ञान माऊली' या भक्तिमय संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वेरीमध्ये देखील या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यास प्रचंड प्रतिसाद लाभला.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या पुढाकारातून या अभिनव संकल्पनेची अंमलबजावणी करण्यात आली. त्यानुसार ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता स्वेरीच्या खुल्या रंगमंचावर 'ज्ञान माऊली' या भक्तिमय संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संत ज्ञानेश्वर महाराजांचे जीवनकार्य, साहित्य, विचार आणि आध्यात्मिक संदेश संगीत, अभंग, नृत्य, नाट्य व विविध कलाविष्कारांच्या माध्यमातून उपस्थित श्रोत्यांसमोर मांडण्यात आला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या अभंगांनी आणि भक्तिमय सादरीकरणाने कार्यक्रमस्थळी आध्यात्मिक व भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. प्रमुख पाहुण्या शर्वरी कुलकर्णी यांनी 'संत ज्ञानेश्वर महाराजांचे विचार आणि त्यांचे महान साहित्य येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.' असे सांगितले. संत ज्ञानेश्वर महाराजांनी मांडलेला वैज्ञानिक दृष्टिकोन, 'मैत्र जीवांचे' ही बंधुभावाची भावना, तसेच भूतदया आणि विश्वकल्याणाची संकल्पना आजच्या काळातही तितकीच महत्त्वाची आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मवर्षानिमित्त राज्यातील विविध भागांमध्ये एकाच वेळी आयोजित करण्यात आलेल्या या 'ज्ञान माऊली' कार्यक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचा आणि कार्याचा जागर करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम संस्मरणीय ठरला. या कार्यक्रमास पंढरपूर पंचक्रोशीतील झंकार कुलकर्णी, रूपक कुलकर्णी, पियुष आवारे, सर्वदा मोहोळकर, कौस्तुभ चांगभले, जयेश कुलकर्णी, आदिता कुलकर्णी, वेणूगोपाळ संगीत विद्यालय मधील कलावंत, वारकरी बांधव, भाविक, नागरिक, रसिक, कार्यक्रमाचे समन्वयक धीरज साळुंखे व संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, स्वेरी लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ.बनकर, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. एन. ए. तळवलकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.